Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Referred Indexed

Multidisciplinary International Research Journal

( CCCXLIV ) 344 -H

## WOMEN IN INDIA AND ABROAD






Chief Editor

Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor

Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon Latur
Maharashtra .413523

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To :

Aadhar Publications

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | An Overview Of Bharatiya Mahila Bank (Bmb) Women Bank In India | **Anandan K** | 1 |
| 2 | Participation Of Women In Indian Politics | **H.M.Krishna** | 4 |
| 3 | Life and Works of TheAssamese Polymath Srimanta Sankardeva | **Hridoy Ranjan Borah** | 8 |
| 4 | The Value of Philosophy in determining the ideals of education | Nabajyoti Das | 12 |
| 5 | Women's Role in the Indian National Movement | **Jolly Suresh Sonkar** | 14 |
| 6 | Title - Festivals Of Karbi- Tribe | **Taz Uddin Choudhury** | 18 |
| 7 | Introduction of Environmental Accounting Course in Colleges and Universities | **Ramesh L** | 21 |
| 8 | Concept of State and Government: A Philosophical Appraisal | **Mouchumi Hazarika** | 26 |
| 9 | Preserving Digital Information | **Mr. Sadashiv B. Warvate** | 32 |
| 10 | The God of Small Things: Pocolonial Issues in Indian Family | **Dr. Prabhakar Shivraj Swami** | 35 |
| 11 | Women Empowerment and Use of Contraceptive – A Review | **Nabaneeta Dutta** | 38 |
| 12 | Ecological Concerns In Saint Akkamahadevi's Vachanas | **Poornima.P.S.** | 40 |
| 13 | Liberty, Equality and Justice in Political and Social Philosophy | **Antaripa Chutia** | 44 |
| 14 | Changing Image of Indian Women: A Study | **Shashikant S. Shende** | 48 |
| 15 | घरेलू हिंसा एवं कानूनी संरक्षण | अनिता सोनी | 51 |
| 16 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया | प्रा. पूजा हिरामण गांगोडे | 56 |
| 17 | महिलाओं के मौलिक अधिकार | सुश्री ज्योति जाटव | 59 |
| 18 | अभिमन्यु अनत के त्रिखंडी उपन्यास (लाल पसीना, गाँधी जी बोले थे, और पसीना बहता रहा) में गिरमिटिया जीवन | जयन्ती | 64 |
| 19 | भारतीय समाजातील स्त्रियांचा विभिन्न कालखंडातील दर्जा | डॉ.प्रवीण मानसिंग कांबळे | 68 |
| 20 | विशाखा समिती व लैंगिक छळाचे प्रतिबंधन | डॉ. अंजली जोशी- टेंभुर्णीकर | 73 |
| 21 | भारतरत्न इंदिरा गांधी राजकीय प्रवास | प्रा. डॉ. संगीता पाठराबे | 78 |

गृहीतकृत्ये-

१.भारतीय समाजात पुरुषांचे व महिलांचे स्थान वेगवेगळे आहे.

२.शहरी,ग्रामीण,आदिवासी भागातील स्त्रियांचे स्थान सारखेच आहे.

३.खुल्या प्रवर्गातील स्त्रीयांपेक्षा अनुसूचित जाती,जमातीतील स्त्रियांच्या समस्या या वेगवेगळया आहेत.

४.शिक्षणामुळे स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धती –**

संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीवर आधारीत असले तर त्या संशोधनाला प्रमाण मानले जाते. एखादा विषय,एखादी घटना ,व्यक्ती ,समूह ,समाज किंवा कोणत्याही अध्ययन समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे व वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश होय. वैज्ञानिक पद्धती उपयोगात आणून संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण करणे म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय.प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.यात लिखित ग्रंथ ,मासिकांचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधनाचे महत्व-**

प्रस्तुत संशोधनामुळे वैदिक कालखंड,स्मृती कालखंड,मध्ययुगीन कालखंड तसेच इंग्रज राजवटीचा कालखंड किंवा आधुनिक कालखंड या विभिन्न कालखंडात स्त्रियांची स्थिती,दर्जा कसा होता याची माहिती उपलब्ध होईल. प्रत्येक कालखंडात स्त्रियांवर कशा प्रकारे बंधने घालण्यात आली त्यांच्या अत्याचारात,शोषणात कशी वाढ झालीया विषयक माहिती उपलब्ध होईल.तसेच शिक्षणामुळे त्यांच्या स्थितीत,त्यांच्या दर्जात समानता,परिवर्तन घडून आले.स्त्रियांची विभिन्न कालखंडातील स्थिती व परिवर्तनाची माहिती समजेल. संशोधकांना,अभ्यासकांना या संशोधनाचा निश्चितच उपयोग होईल.

**विषय विश्लेषण**

भारतीय समाजात स्त्री समस्यांना इतर घटकही कारणीभूत आहेत.भारतीय समाजात आजही आणि नेहमीच स्त्रियांचा आदर होत आला आहे. हिंदू समाजात मातृत्वाचा आदर होतो.स्त्रीचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे समजले जात आहे. तिंचे वर्णन दुर्गा,लक्ष्मी,सरस्वती अशा स्वरुपात करण्यात आले आहे. स्त्रीला धन आणि ज्ञानाचे प्रतीक मानले गेले आहे.इतिहासाचा मागोवा घेतला तर असे दिसून येते कि, अगदी सुरुवातीच्या काळात स्त्री-पुरुष विषमतेचा विचारच केला जात नव्हता. कारण स्त्री पुरुषांमध्ये कोणतेच बंधन नव्हते.सर्वच क्षेत्रात तिचा मुक्त संचार होता.मानसिक व बौद्धिक दृष्टीने स्त्रीला पुरुषांपेक्षा कमी मानले जात नव्हते. सर्व सामाजिक समारंभात ती सहभाग घेत असे.

सुरुवातीच्या काळात अरेबियातील मुसलमान स्त्रिया सुद्धा पुरुषांच्या बरोबरीनेकाम करीत होत्या कालांतराने या परिस्थितीत बदल झाला.पुरुषसत्ताक,पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली.तिला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले.विवाहासाठी जोडीदार निवडण्याचे अधिकार काढून टाकण्यात आले. सामाजिक व धार्मिक उत्सवात भाग घेण्यास बंदी घालण्यात आली.तिला प्रतिष्ठेचा विषय मानून बहुपत्नीत्वाची प्रथा सुरु करण्यात आली. सतीप्रथा आणि पतिव्रतेचा संबंध जोडण्यात आला.तसेच तिला जिवंत जाळण्याची प्रथा अस्तित्वात आणली गेली.बालविवाह केले जाऊ लागले.भारतीय समाजात सैधान्तिक दृष्टीने जे दिसून येते ते व्यावहारिकदृष्ट्या दिसून येत नाही.

**विभिन्न कालखंडात स्त्रियांचीस्थिती**

**वैदिक कालखंड -**

हा कालखंड इ.स.पू.६००० वर्षापर्यंतचा मानला जातो.या काळात स्त्री-पुरुष समानता होती. एक काळात स्त्रीयांची स्थिती प्रगत होती. स्त्रियांना शिक्षण,संपत्ती,विवाह या बाबतीत पुरुषांच्या बरोबरीने स्थान

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 344 (CCCXLIV ) H
ISSN : 2278-9308
March, 2022

लिंगाच्या आधारावर सुद्धा स्त्री-पुरुष असा भेद केला जातो. मुलींमध्ये लज्जाशीलतेचा गुण विकसित केला जातो.यावरून स्त्री आणि पुरुषांमध्ये सामाजिक आशयअंतर्भूत असल्याचे दिसून येते.भारतामध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात असल्याने पुरुषांना स्त्री पेक्षा श्रेष्ठ समजले जाते. श्रेष्ठ कनिष्ठतेच्या तत्वानुसार त्यांच्या भूमिका निर्धारित केल्या जातात.लिंग असमानता ही सुद्धा एक प्रकारे सामाजिक विषमता आहे.

पारंपारिक भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती अधिक दयनीय स्वरूपाची होती.आधुनिक काळात त्यांची सामाजिक स्थिती फारशी सुधारली आहे असे म्हणता येणार नाही. स्त्रिया पारंपारिक समाजात शिक्षण,नोकरी करणे संघटना स्थापन करणे या बाबत नेहमीच उपेक्षित राहिल्या.सन १९३७ पूर्वी स्त्रियांना संपत्ती विषयक कोणताही विशेषाधिकार नव्हता.डॉ आंबेडकर यांनी संसदेत मांडलेल्या हिंदू कोड बीलानंतर स्त्रियांना वडीलांच्या व पतीच्या संपत्तीत अधिकार मिळू लागले. राजकीय निर्योग्यतेच्या दृष्टीने पहिले तर आपल्या असे लक्षात येते कि,सन १९१९ पर्यंत स्त्रियांना मताधिकार सुद्धा पूर्णपणे प्राप्त झाला नव्हता.सन १९३५ च्या कायद्याने त्यात विशेष सुधारणा करण्यात आली नाही.स्त्रियांना मतदानाचा अधिकार केवोल शिक्षण,पतीची स्थिती,सांपत्तिक स्थिती इ. आधारावर देण्यात आला.स्वतंत्र भारतात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना सुद्धा राजकीय क्षेत्रात पूर्ण अधिकार प्राप्त झाले आहेत.
वैदिक काळापासून ते स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळापर्यंत स्त्रियांचा सामाजिक दर्जा एकसारखा घसरत गेला हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१.स्त्रियांच्या शिक्षणावर पूर्वीपासून प्रतिबंध
२.भारतीय संयुक्त कुटुंब पद्धतीतून पाळल्या जाणार्या अनेक रूढी व परंपरामुळे स्त्रीचे क्षेत्र संकुचित बनले.
३.विधवा पुनर्विवाहास बंदी घातल्याने स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय झाली होती.
४.बालविवाह,हुंडा पद्धती,जरठकुमारी विवाह,कुलीन विवाह या कुप्रथांमुळे त्यांच्या अवनतीत अधिकच भर पडली.
५.परकीय आक्रमणापासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे,त्यांचे अपहरण होऊ नये म्हणून त्यांना डांबून ठेवले जात असे त्यामुळे त्यांचा विकास खुंटला.

समारोप

आधुनिक काळामध्ये स्त्रियांच्या असमानतेतून स्त्रियांच्या आत्महत्या,स्त्रियांची छेडखानी,नववधूला जाळण्याची प्रथा,बलात्कार,हुंडा पद्धती ,कुमारी माता, देवदासी प्रथा,वेश्याव्यवसाय,अनाथ्वा वृद्ध स्त्रियांच्या समस्या अशा समस्या असून ह्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.
आजची स्त्री ही जागृत झाली आहे.तिला आपल्या दयनीय स्थितीची जाणीव झाली आहे.परंतु या जाणीवा फक्त मध्यम वर्गीय स्त्रियांमध्ये आहेत.कनिष्ठ जातीतील स्त्रियांमध्ये या जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे.कारण ग्रामीण भागातील स्त्रिया शेतावर तसेच इतर ठिकाणी रोजंदारीवर काम करतात.अशा कमकुवत गटातील स्त्रिया भयावह जीवन जगत आहेत.वरील सर्व प्रश्न स्त्री - पुरुष असमानतेतून निर्माण झाले आहेत.या प्रश्नांची सोडवणूक होणे ही काळाची गरज आहे.अन्यथा आजच्या प्रगत समाजामध्ये जागतिकीकरण, खासगीकरण, उदारमतवाद, स्त्री-पुरुष असमानतेतून निर्माण होणार्या सामाजिक व राजकीय समस्यांना आपण बळी पडू यात काही दुमत नाही.

निष्कर्ष –

स्त्रियांच्या सामाजिक,आर्थिक ,राजकीय,सांस्कृतिक स्थितीचा अभ्यासावरून असा निष्कर्ष काढण्यात येतो कि स्रीयांची भारतीय समाजातील विभिन्न कालखंडात स्थिती व दर्जा यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.समाजसुधारकांचे स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न यामुळे त्यांच्या दर्जात सुधारणा होत आहे.स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचा विचार केला तर वैदिक कालखंड,इंग्रज राजवट किंवा आधुनिक कालखंडात त्यांच्यात शिक्षणामुळे परिवर्तन झाल्याचे दिसून येते. स्त्रियांच्या विकासासाठी सार्वजनिक क्षेत्रातील स्त्रियांचा सहभागवाढविण्यासाठीच्या उपाययोजना,स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठीचे उपाय,स्त्री सक्षमीकरण यासारख्या बाबींचा अभ्यास आवश्यक ठरतो.एकविसाव्या शतकातील नवीन घटकांचा,घडामोडींचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर दूरगामी परिणाम होत आहे.आर्थिक स्वावलंबन,नवीन तंत्रज्ञान,नवीन शैक्षणिक संधी,माहिती तंत्रज्ञान या घटकांमुळे स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे.